
# एका जनसंघर्षाची कहाणी



प्रकाशक : नर्मदा बचाव आंदोलन पुणे    सहयोग राशि - रु. ७/-    १९९३ डिसेंबर

## एका जनसंघर्षाची कहाणी

गेली आठ वर्षे नर्मदा खोऱ्यात सरदार सरोवर प्रकल्पाविरुद्ध जनआंदोलन चालू आहे. पर्यायी विकासाच्या व्यापक लढाईचा हा भाग असून, देशभरातून या संघर्षाला वाढता प्रतिसाद आणि परावलंबी पर्यावरणीय व आर्थिक दृष्ट्या विनाशक 'विकास' नीतिला हे आहवान आहे. शासकवर्गाकडून अत्याचार, बदनामी होऊनही गुजरात, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील आदिवासी शेतकरी स्त्री-पुरुषांनी अहिंसक लढा तीव्र करीत आणला आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणजे प्रत्यक्ष बुडितालाच 'डूबेंगे पर नहीं हटेंगे' म्हणून आह्वान दिले गेले- मणिबेली सत्याग्रहाद्वारे

१९९३ च्या पावसाळ्यात धरणामुळे शेकडो घरे बुडाली- तरीही मणिबेली व अन्य गावातील आदिवासी हटले नाहीत. आपला निश्चय प्रत्यक्षात आणून शासकीय दहशतवादालाच उत्तर दिले. दरम्यान लोकशक्ती, देशभरातील पाठिंबा, मुंबईतील १७ दिवसांचा उपवास व जलसमर्पणाच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाचा सर्वांगीण पुनर्विचार करण्याची प्रक्रिया सुरू झाली. जागतिक बँकेला प्रकल्पातून हटविल्यानंतर 'आंदोलना'चा हा दुसरा महत्त्वाचा टप्पा होय. पर्यायी विकासाच्या व्यापक लढाईतील या प्रमुख संघर्षाला आपणही साथ द्या.

## नर्मदा व सरदार सरोवर

मध्य भारताची जीवनरेखा- नर्मदा अनेक युगांपासून काठावरील संस्कृतीचे, आर्थिक व सामाजिक जीवनाचे पोषण करणारी, राजकीय ऐतिहासिक स्थित्यंतरांची साक्षी. नर्मदा व तिच्या ४१ उपनद्यांवर ३० मोठी, १३५ मध्यम, ३००० लहान धरणांच्या नर्मदा खोरे विकास प्रकल्पातील सरदार सरोवर व नर्मदा सागर (आता इंदिरा सागर असे नाव आहे) ही मुख्य धरणे. यापूर्वी तवा, बरगी, बारना, सुकता या धरणांचे बांधकाम झाले आहे, ज्यांच्यामुळे विस्थापन, दलदलीकरणासारखे प्रश्न निर्माण झाले आहेत. पैशाच्या अभावी त्यांचे काम रखडत आहे. नर्मदा सागर (म.प्र.)ची हीच अवस्था आहे. सरदार सरोवराला या धरणापासूनही पाणी पुरवले जाणार आहे व म्हणून सरदार सरोवराचे लाभ हे या धरणावर अवलंबून आहेत.

शासनाच्या दाव्याप्रमाणे ४५५ फूट उंचीच्या प्रस्तावित सरदार सरोवर

धरणामुळे गुजरातेतील १८ लाख हेक्टरास सिंचनाचा लाभ मिळेल. १४५० मेगॅवॅट विजेची स्थापित क्षमता निर्माण होईल. ८२१५ खेडी व १३२ शहरांना पिण्याचे पाणी मिळेल, उद्योगांना पाणी मिळेल, पूरनियंत्रण होईल, रोजगार निर्मिती होईल इत्यादी आणि हे सर्व फार माफक किंमत देऊन. त्यामुळे सरदार सरोवर हे 'मानवी चेहऱ्याच्या विकासाचे प्रतीक होय' असा दावा सरकार व धरण समर्थक करतात.

या धरणाविषयी सर्व सवाल आज अधिक उग्र बनत आहेत. मात्र उघडपणे सवाल करणाऱ्यांना, लोकांच्या हक्कांच्या बाजूने लढणाऱ्यांना, दडपशाही, बदनामीला तोंड द्यावे लागत आहे. पाणी प्रश्नाचे खरे स्वरूप व त्यावरील दीर्घकालीन उपाय यावर गुजरातेत चर्चा होऊ न देण्याचा शासकवर्गाचा प्रयत्न रहात आला.

प्रकल्पाचा पायाच कच्चा; अभ्यास व योजना अपूर्ण.

- प्रकल्पाच्या बांधकामानंतर १२-१३ वर्षांनीही धरणासंबंधीचे मूलभूत अभ्यास अजूनही अपूर्ण आहेत, हे प्रकल्प मंजूरीसाठी तयार नसल्याचे केंद्रीय पर्यावरण खात्याने म्हटले होते. तरीही राजकीय दडपणाखाली जून १९८७ मध्ये पर्यावरण खात्याला सशर्त मंजूरी द्यावी लागली.
- या शर्तींमध्ये विस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास, लाभक्षेत्र विकास, आरोग्यावरील परिणाम इत्यादीसंबंधी अभ्यास व आयोजन १९८९ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, ते झाले नाही म्हणून ही मंजूरी रद्द झाल्याचे पर्यावरण विभागाने १९९० सप्टेंबरच्या नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीच्या पर्यावरण उपदलाच्या बैठकीत स्पष्ट केले.
- नोव्हेंबर १९९२ व १६ मार्च १९९३ च्या नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीच्या पर्यावरण उपदलाच्या बैठकीतूनही हे अभ्यास अपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले म्हणूनच १९९३ मध्ये महाराष्ट्रातील गावात बुडित येऊ नये अशी भूमिका उपदलाने घेतली.
- नर्मदेतील पाण्याच्या प्रमाणाचा अंदाजही आता नवी व जादा माहिती आल्यामुळे अधिक योग्य सांगता येतो. नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाने पाण्याचे प्रमाण वाढवून सांगितले होते. १९९२ मध्ये जागतिक बँकेने नेमलेल्या निष्पक्ष समीक्षा दलानेही पाण्याबाबतचे सरकारी अंदाज चुकीचे असल्याचे सांगून अन्य अभ्यासही झाले नसल्याचे स्पष्ट केले आहे.
- १९९२ ऑक्टोबरमध्ये जागतिक बँकेनेच घातलेल्या व भारतास मान्य असलेल्या, ६ महिन्यात पूर्ण करावयाच्या विस्थापन व पर्यावरणविषयक किमान शर्तीही शासनास पूर्ण करता आल्या नाहीत.
- आज अनेक नवे घटक उपस्थित झाले आहेत. नवे खर्च, नवे अभ्यास यामुळे मूळ योजनेतील ठोकताळ्यांपेक्षा अनेक नवी शास्त्रीय

व साभाजिक तथ्ये सामोरी येत आहेत. अनेक पर्यायही आहेत. या कशाचाच संपूर्ण व सखोल अभ्यास झालेला नाही.

## लाभांची स्वप्ने : दुष्काळी भागांचा अपेक्षाभंगच

### सिंचन

मुळात नर्मदेतील पाण्याचा अंदाजच चुकला आहे. २७.२२ दश लक्ष एकर फुटांऐवजी २२.६९ द. ल. ए. फू. असल्याचे नव्या अंदाजावरून (१९८५ : अनंतरामन, मुख्य अभियंता म. प्र.) दिसून येते. केंद्रीय जल आयोगाने ते मान्यही केले.


मध्य प्रदेशात नर्मदा सागर धरण सरदार सरोवराच्या बरोबरीने बांधले गेले तरच लाभ पूर्णपणे मिळतील. सिंचनाचे ३० % व वीजनिर्मितीचे २८% लाभ त्यावर अवलंबून आहेत. मात्र हे धरण पूर्ण होण्याची चिन्हे नाहीत.

कच्छ, सौराष्ट्र व उत्तर गुजरातच्या दुष्काळी भागातील कालवे अगदी टोकाला आहेत. या भागाला सिंचन व पिण्याचे पाणी पुरविण्यावरच सरदार सरोवराचे समर्थन होऊ शकते. मात्र सौराष्ट्रात २०२० पूर्वी व कच्छमध्ये २०२५ पूर्वी कालवे पोहोचणार नाहीत असे जागतिक बँकेच्या 'नेक्स्ट स्टेप्स' या सप्टेंबर १९९२ च्या अहवालात म्हटले आहे. केंद्रीय जलसंसाधन खात्याने आंदोलनास २ ऑक्टो. १९९२ ला लिहिलेल्या पत्रात त्याला दुजोरा देण्यात आला पाणी आलेच तर कच्छच्या एकंदर शेतीलायक भागाच्या १.६% सौराष्ट्राच्या ९.३% व उत्तर गुजरातच्या २०% भागातूनच कालवे जातील. या पाण्यामुळे, लाभक्षेत्राच्या ५२% भागाला दलदलीकरण व क्षारीकरणाचा धोका आहे याची शक्यता आहे काही भागात फारच जास्त तर काही भागात जास्त आहे. लाभक्षेत्रांपैकी मृद्-पाहणी (Soil swrvey) अभ्यास फक्त १/५ भागाचेच झाले आहेत.

दुष्काळग्रस्त भागातल्या कालव्यात उन्हाळ्याच्या दिवसात पाणी नसेल. मही नदीपर्यंतच्या भागात (पहिल्या टप्प्यात) पाच मोठे साखर कारखाने आकारत आहेत. त्याचबरोबर बडोदा, भरुच जिल्ह्यात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. म्हणजेच खेडा, अहमदाबाद, बडोदा, भरुच या श्रीमंत जिल्ह्यांतच जास्तीत जास्त पाणी जाईल.

दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या तुलनेत बिगर-दुष्काळग्रस्त तालुक्यांना सिंचनाने जास्त प्रमाण मिळेल.

सिंचनाचे ७६.४९% लाभ गुजरातच्या मैदानी प्रदेश व पूर्व सौराष्ट्राला मिळणार आहेत. येथे दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण क्रमशः २३.७८% व १६.१७% आहे. पूर्व व इशान्य पर्वतीय भागात व द. गुजरातच्या सखल भागात सिंचनाचे लाभ फारच कमी आहेत. तेथे दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे ४१.३% ३७.७४% आहे.




सरदार सरोवराचे प्रस्तावीत लाभक्षेत्र.
कच्छ, सौराष्ट्रला काय मिळणार ते यावरून स्पष्ट होते.

## पिण्याचे पाणी - मृगजळाची वाट?

- नर्मदा पाणी तंटा न्यायाधिकरणासमोर पाण्याची मागणी करताना गुजरात सरकारने १.०६ द. ल. ए. फू. पाणी बिगर-सिंचन वापरासाठी म्हणून काही शहरे व उद्योगांसाठी मागितले. कोणत्याही खेड्याचा त्यात समावेश नव्हता (१९७९) धरण वादग्रस्त होत चालले तसे खेड्यांची संख्या ४,७२०, नंतर ७,२३५ (डिसेंबर १९९०) नंतर ८,२१५ (१९९१ साली) होत गेली तेव्हा पाण्याचा वाटाही वाढता असणे आवश्यक आहे. त्याची तरतूद १९७९ साली जी झाली, (१.०६ द. ल. ए. फू.)

तेवढीच आहे. तेव्हा याची संगती कशा लावायची?

- ही पाणी पुरविण्याची योजना, त्यासाठी लागणारा ५,००० कोटींचा खर्च जबाबदारी, योजना पूर्ण केव्हा होणार या सर्वच बाबतीत असमाधानकारक उत्तरे मिळतात. पेयजल व औद्योगिक वापरासाठी जल हे सरदार सरोवर प्रकल्पाचे लाभ म्हणून सांगितले आहेत. पण त्याच्या खर्चाची तरतूद मात्र सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेड (SSNNL) कडे नाही. आपली ह्या बाबतची सर्व जबाबदारी ते गुजरात वॉटर सप्लाय ॲण्ड स्युवरेज बोर्डावर टाकून मोकळे झाले आहेत. व हे बोर्ड, खर्च किती, कोण कसा आणणार याविषयी अंधारातच आहे.
- मही नदीतून किंवा खंबातच्या आखातातून पाईपलाईन टाकून कच्छ सौराष्ट्राला पिण्याचे पाणी देण्याची आश्वासने मनमानीपणे दिली व रद्द केली जातात.

## वीज : फक्त चमकणार?

- सरदार सरोवरातून १४५० मेगॅवॅट वीज 'मिळणार' नाही. ती आहे स्थापित क्षमता. पुढील तक्त्यातून निश्चित वीज किती मिळेल ते स्पष्ट होईल.

| | स्थापित क्षमता | निश्चित वीज सुरुवातीला | निश्चित वीज शेवटी |
|---|---|---|---|
| सरदार सरोवर | १४५० | ४३९ | ५० |
| नदीपात्र वीजघर | १२०० | ४१५ | ० |
| कालव्यातील वीजघर | २५० | २४ | ५० |

वीजनिर्मितीत हा फरक पडण्याचे कारण उघड आहे. पाणी धरणात भरू लागते तेव्हा ते नदीपात्रातल्या वीजघराच्या टर्बाइन्सवर वीज तयार करण्यासाठी सोडले जाते. पुढे कालवे झाले व त्यात पाणी जायला लागले की नदीपात्राच्या वीजघरांसाठी पाणी कमी मिळायला लागेल. (कधीमधी पाणी वाढेल तेव्हा हे वीजघर पुन्हा कामाला उपयोगी येईल अन्यथा त्याचे काम थंडच असेल.) पण कालव्यातील वीजघरातली वीज निर्मिती मात्र वाढेल.

- नर्मदा सागर प्रकल्प वेळेवर पुरा झाला नाही तर वीजनिर्मिती २८% नी घटेल.

सरदार सरोवर प्रकल्प स्वत: किती वीज खर्च करीत आहे याचा हिशोब लाभ - हानीच्या गुणोत्तरात दाखवलेला नाही.

- वीज निर्मिती केंद्राचे काम खोळंबले आहे. जपानकडून ५६० कोटी रुपयांचे कर्ज थांबल्याने, तेथील सुमितोमो कंपनीची विद्युत जनित्रे विकत घेता येत नाहीत, उलट कोट्यवधीत घसारा भरावा लागत आहे.
- वीज निर्मिती केंद्राचा खर्च परवडत नसल्याने रु २७०० कोटींच्या या प्रकल्पाचे खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. या कंपनीला जनतेकडून भाग भांडवल मिळेल अशी आशा गुजरात ठेवून आहे. एकतर ही आशा भोळी आहे व दुसरे म. प्र. व महाराष्ट्राच्या लाभांवर याचा विपरित परिणामच होईल

## न परवडणारा प्रकल्प : लाभहानीचा दर विपरित.

- १९८५ मध्ये जागतिक बँकेच्या स्टाफ अॅप्रेझल रिपोर्टमध्ये या सर्व कमतरतांना धरून धरणाचा खर्च रु. १३,६०४ कोटी सांगितला गेला. मात्र नियोजन मंडळाने १९८८ मध्ये मंजूरी देताना हाच खर्च रु. ६,४०६ कोटी सांगितला. त्यावेळी हे धरण १७ ते २२ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्याची (इ. स. २००५ किंवा इ. स. २०१०) योजना होती. मात्र त्यावेळी केलेल्या वित्तीय आकडेवारीनुसार हानी लाभाचे गुणोत्तर १ : ०९१ असेच येत होते.
- १९८५ मध्ये जागतिक बँकेने केलेल्या आकडेवारीनुसार अनेक खर्च बाकी असताना, अनेक अभ्यास झाले नसताना, आर्थिक लाभदर (रेट ऑफ इकॉनॉमिक रिटर्न) केवळ १३ होता. बँकेचा किमान दर १२ असतो. त्यातही अनेक अटी (स्विचिंग व्हॅल्यूज) होत्या. धरणाच्या कामात ५ वर्षे उशीर झाला, खर्चामध्ये १५% वाढ झाली, लाभ कमी झाले, यापैकी कुणा एका घटकातही बदल झाला तर हा लाभ दर शून्यावर येईल असे म्हटले होते. आजची स्थिती पाहता हा दर आता शून्याच्या खाली गेला आहे.
- १९८८ मध्ये सी. सी. पटेल व कन्सल्टंटस यांनी सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेडला सादर केलेल्या रिपोर्टमध्ये १७ ते २२ वर्षात रु. ६,४०६ कोटींमध्ये धरण फायदेशीर होणार नाही हे स्पष्ट केले. नव्या प्रस्तावानुसार दहा वर्षात (१९८८ पर्यंत) रु. ११,१५४ कोटींच्या खर्चाने प्रकल्प पूर्ण करणे फायदेशीर ठरेल. याही बाबत, शासनानेच सर्व वित्तीय मानक खरे धरून गणित केल्यास धरणाचा हानी-लाभ दर (१ : १.५०

किमान असावा) १ : .०८८ असाच विपरीत येत होता. एवढे असूनही धरणाचा खर्च रु. ६,४०६ कोटी हेच सरकार सांगत राहिले.

- एवढा खर्च धरला तरी, त्यावेळी देखील एवढी रक्कम गुजरातला उभी करणे शक्य नव्हते. दरवर्षी किमान रु. १,२०० कोटी उभे करणे (इ. स. २००० पर्यंत) गुजरातच्या कुवतीबाहेरचे आहे.
- गुजरातच्या आठव्या पंचवार्षिक योजनेतील एकंदर सिंचन खर्चाचा ८५% भाग एकट्या सरदार सरोवरासाठी खर्ची घातला.

गुजरातेत सध्या १२५ मध्यम व मोठे प्रकल्प अर्धवट आहेत. त्यांचा साचलेला खर्चच रु. १,४०० कोटींवर जातो. अशा स्थितीत एका बेभरवश्याच्या योजनेवरही असे पैसे उडवणे कितपत योग्य आहे?

- एवढे करूनही काय घडेल? उदा. १९९२-९३ या आर्थिक वर्षात गुजरात सरकारने रु. ८०० कोटींचा आराखडा ठरविला. मार्च ९३ मध्ये विधानसभेत नर्मदा विकास मंत्र्यांनी कबूल केले की ८०० पैकी प्रत्यक्षात रु. ५०० कोटीच उपलब्ध झाले, व धरणासमोर आर्थिक संकट आहे. विशेष म्हणजे या ५०० कोटीत १२० कोटी जागतिक बँकेचे होते. गेल्या चार वर्षांहून अधिकच्या काळात सार्वजनिक ठेव योजनेत फक्त रु. ५५ कोटी धरणासाठी मिळाले. पैसे नाहीत म्हणून जानेवारी ९३ मध्ये, धार्मिक दंगलीत मारल्या गेलेल्यांसाठी केंद्राने दिलेल्या रु. ६ कोटींपैकी रु. ४ कोटी नर्मदा बाँडस्च्या रूपात दिले गेले. करमुक्त बाँडस् किंवा परदेशस्थ भारतीयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव मंजूर व्हायचे आहेत.
- त्यात जागतिक बँकेच्या माघारीचा निर्णय आला.

## जागतिक बँकेच्या माघारीचे परिणाम

- बँकेने एकंदर ४५० दशलक्ष डॉलर्स (रु. १३५०) कर्ज मंजूर केले होते, त्यापैकी २८० द. ल. डॉलर्स दिले. उरलेले १७० द. ल. डॉलर्स त्याशिवाय सुमारे दीड वर्षांपूर्वीच कालव्यांच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ३७५ द. ल. डॉलर्स व 'नर्मदा विकासाच्या' नावाखाली १०० द. ल. डॉलर्सच्या कर्जाची मागणी केली व कालव्याच्या तिसऱ्या टप्प्यासाठी मागणी केल्याचे कळते. एकंदरीत जागतिक बँकेकडून ७२० द. ल. डॉलर्स रक्कम प्रस्तावित होती व त्याच्या आधारावरच पुढच्या योजना आखल्या गेल्या हे १९९३ च्या गुजरातच्या 'विकास योजनेचा आराखडा' या दस्तावेजातून स्पष्ट होते.
- जपानकडून २८०० कोटी येन कर्ज मिळणार होते. ते स्थगित झाले. त्यामुळे विद्युत निर्मिती जनित्रे सुमितोमो कंपनीकडून विकत घेणे

अशक्य झाले, उलट कंपनीला घसारा भरावा लागत आहे. जर्मनी व ब्रिटन कडून कर्जाच्या वाटाघाटी चालू होत्या, त्याची शक्यता आता उरली नाही. एकूण प्रकल्पाची पत कमी झाली.

या धरणाशी संबंधीत पाणलोट क्षेत्र विकास, पुनर्वसन, कालवे, वनीकरण विद्युतनिर्मिती, कालव्यातून (सौराष्ट्र-कच्छला) पाणी पंप करण्याची योजना पिण्याचे पाणी पुरवण्याचा खर्च हे सर्व सरकारी आकडेवारीनुसारच एकत्र केले तर धरणाचा खर्च रु.२५,००० कोटींपेक्षा कमी येत नाही. केंद्र शासनाने एप्रिलमध्ये आश्वासन दिले की जागतिक बँकेकडून न मिळणारे १७० द. ल. डॉलर्स, येत्या अडीच वर्षात उपलब्ध केले जातील. कसे? बाकीच्या रकमेचे, खर्चाचे काय?

## अभूतपूर्व विस्थापन; पुनर्वसन अशक्य

सरदार सरोवरामुळे महाराष्ट्रातील ३३, गुजरातेतील १९ व म. प्रदेशातील १९३ गावांतील किमान २ लाखांवर लोक विस्थापित - प्रकल्पग्रस्त होतील. याशिवाय कालव्यांच्या जाळ्यामुळे गुजरातेतील १,७०,००० खातेदार प्रकल्पग्रस्त होतील. पैकी २५,००० खातेदारांची बहुतेक जमीन जाईल. याखेरीज, अभयारण्य, पुनवर्सनासाठी घेतलेल्या जमिनीवरील मजूर - खंडकरी, पर्यायी वनीकरण इ. मुळे विस्थापित होणारे, कॉलनीमुळे विस्थापित झालेल्या ६ गावांचे लोक, गरुडेश्वर वियर डॅम, पॉवर सब स्टेशन इ. नवे उपप्रकल्प त्यामुळे विस्थापित होणारे, यांना बुडित क्षेत्रातल्यांप्रमाणे विस्थापित मानलेच नाही.

बुडितातही विस्थापितांची संख्या किती ते १९९३ च्या मार्च पर्यंतही शासनाला सांगता आले नाही. जागतिक बँकेची ती एक अट होती. एकंदर विस्थापित लोक ६७,००० आहेत येथून सुरुवात करून, आकडे बदलवीत २९ एप्रिल १९९३ रोजी गुजरात उच्च न्यायालयातील 'ऑथॉरिटी'च्या सांगण्यानुसार बुडित क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त कुटुंबांची संख्या महाराष्ट्र - ३,५००, गुजरात - ४,५०० व म. प्रदेश ३३०१४ अशी आहे.

विस्थापितांची घरे, शेती, झाडे, जमीन - जंगल, पाणी या साधनसंपत्तीचे मोल त्यावर त्यांचे अवलंबित्व व अधिकार यांची काहीच क्षिती बाळगली गेली नाही. या सर्वांची भरपाई होऊच शकत नाही.

आजपर्यंतच्या कथित पुनर्वसनाचे अनुभव कटू आहेत. लोकांना अंधारात ठेवून, दडपण, लाचलुचपत, भ्रष्टाचार, मानसिक दडपण अथवा

सरळ सरळ दडपशाहीने लोकांना गावातून हटविण्याचे प्रयत्न चालले आहेत. पुनर्वसन स्थळी गुजरातेतीलच काही गावांचे अर्धेमुर्धे लोक विखुरले, जमिनीचे पट्टे नाहीत पाणी, चारा, इंधन, जंगल यांची अडचण अशा अनेक करुण कहाण्या आहेत.

यामुळे अनेक विस्थापित कुटुंबे मूळ गावी परतत आहेत. वडगाम, माकडखेडा, अंतरास, कातखेडी, चिकलदा, अमलाली गावातील पुनर्वसित परतले आहेत.

विस्थापनाच्या लढ्यात नर्मदा खोऱ्यातील संघटनेने कशासाठी विस्थापित व्हावयाचे व त्याचे प्रयोजन काय असा मूलभूत सवाल उपस्थित केला. कोणत्याही प्रकल्पामागील 'सार्वजनिक हिताची' तपासणीच लोकसंघटनेद्वारा केली गेली. माहितीचा अधिकार, सहभागितेचा अधिकार अमंलात आणण्याची मोहीम सुरू झाली. सहभाग म्हणजे अधिकारी सांगतील तेच ऐकून करायचे असे नसून विस्थापित व्हायचे की नाही हे ठरविण्याचा अधिकारही आदिवासी शेतकरी घेतील. त्यापुढे जाऊन जी साधन-संपत्ती नष्ट होऊ घातली, त्यावरील अधिकार सांगणे व त्या साधन संपत्तीचे, त्यावर आधारित जीवनाचे मोल कसे करणार हा सवाल उभा केला. जमीन, जंगल, पाणी, सामाजिक - सांस्कृतिक जीवन यांच्या मूल्यांकनाच्या मोजपट्ट्या, तशी संवेदनशीलता व प्रशासनिक ढांचाच आपणाकडे नाही. या सर्व सवालांचा एकत्रित विचार करून, मग पुनर्वसन शक्य आहे की नाही, या सर्वांची भरपाई करणे शक्य आहे की नाही याचा विचार येतो. प्रकल्पाचा अभ्यास, आदिवासी भागातील, निमाडच्या मैदानी भागातील विस्थापनाचे प्रमाण व गांभीर्य, इतर तऱ्हेच्या विस्थापनाच्या लाटा व आजपर्यन्तचा पुनर्वसनाचा अनुभव यामुळे निष्कर्ष निघतो की विस्थापन हे असमर्थनीय, अन्याय्य आहे.

## जमीन, जंगल, साधनसंपत्तीचा नाश

पर्यावरण म्हणजे जंगल, पाणी यांची साखळी. बुडित क्षेत्रात व लाभ क्षेत्रातील पर्यावरणीय परिवर्तनीय परिणामांचा अभ्यास १९९३ मार्च पर्यंत पूर्ण नव्हता. बुडित क्षेत्रातल्या, जंगलाची किंमत रु. १५ ते रु. ५५ प्रति हेक्टर ५० वर्षासाठी अशावरून जंगलहानीचे मूल्य केले गेले होते.

सरदार सरोवरात १३,७४४ हेक्टर जंगल बुडितात आहे. पुनर्वसनासाठी तळोद्याचे २,७६९ हे हिरवे जंगल तोडले जात आहे. सरदार सरोवरास

पूरक नर्मदा सागरात ४० हजार हेक्टरावर जंगल नष्ट होत आहे. या सर्वांची भरपाई तथाकथित वनीकरणाने होणार नाही; ते 'वनीकरण' देखील किती तकलादू व अशक्यप्राय आहे हे 'मोर्स समितीने' ही स्पष्ट केले.

लाभ क्षेत्राचा पूर्ण अभ्यासच नसल्यामुळे सिंचनाचे दुष्परिणाम व त्याचे आकलन, त्यावरील उपाययोजना याचा आराखडा नाही लाभ क्षेत्राच्या पहिल्या टप्प्यातील एका अभ्यासानुसार त्याच्या किमान ५२ % क्षेत्रात सिंचनामुळे दलदलीकरण होईल. सौराष्ट्र कच्छच्या 'लाभक्षेत्रात' क्षारीकरण दलदलीची गंभीर समस्या उभी राहणार हे प्राथमिक पाहण्यांवरून दिसते. जीवनसृष्टीवरील परिणामांचा अभ्यास महाराष्ट्रात नुकताच कोठे सुरू झाला आहे.

नदीमुखाच्या दिशेकडील पात्रात पाण्याचा प्रवाह कमी झाल्याने भरुचच्या आसपासच्या सुपीक क्षेत्रात भूगर्भातून समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे आक्रमण (सी-इनग्रेस) होण्याची पूर्ण शक्यता आहे. हिलसा जातीच्या माशांची पैदास भारतात मुख्यत्वे नर्मदेतच होते. कोट्यवधीचे परकीय चलन त्यामुळे मिळते. धरणामुळे हीलसाच्या पैदाशीवर गंभीर परिणाम होऊन त्यांची भारतातील संख्या नाममात्र राहणार आहे. सुंदरवनातील हिलसा या पूर्वीच फराका बराजमुळे जवळजवळ नामशेष झाला आहे.

## जागतिक बँकेची माघार : धरणाची पत कोसळली

जागतिक बँक : बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या विरुद्ध १९८५ पासूनच 'आंदोलनाने' मोहीम उघडली होती. आपल्या देशातील सत्ताधाऱ्यांनी परदेशी कर्जाच्या रूपाने (नवीन आर्थिक धोरण येण्याच्या पूर्वीपासूनच) इथले निर्णयकेंद्र, वॉशिंग्टन, टोकियो, पॅरिसला नेऊन ठेवले होते. कर्जाच्या रुपाने जागतिक बँक, आय. एम. एफ. व बहुराष्ट्रीय संस्था त्यांना हव्या असलेल्या केंद्रीकृत, भांडवली व उपभोगवादी विकासाच्या धोरणांना व प्रकल्पांनाच उत्तेजन देतात. अशा प्रकल्पांना लागणारी भांडवली यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान, परदेशी उत्पादन- उपभोग तंत्रे, परदेशी कंपन्यांचीच असते. सरदार सरोवरातही अगदी हेच झाले. जागतिक बँकेने मदत दिल्यामुळे जपान, जर्मनी, इतर युरोपीय देश, सुमितोमोसारख्या कंपन्या या प्रकल्पाच्या पाठिशी उभ्या राहिल्या. नर्मदा खोऱ्यातील आदिवासी, शेतकऱ्यांनी, आठ वर्षे लढून, घेराओ, निदर्शने, प्रश्नोत्तरे या मार्गाने जागतिक बँकेला एका प्रकल्पातून हटविले. जगभरातील जनसंघर्षांना त्यामुळे बळ मिळाले.

ज्या बँकेच्या प्रमाणपत्राच्या आधारे धरणाचे समर्थन होत असे

तिनेच २६ मार्च १९९३ रोजी धरणातून अंग काढून घेतले, त्यामुळे धरणामागची पतच कोसळली. भारताच्या पर्यावरण विभागाने मंजुरी दिली नसतानाही जागतिक बँकेने इथून कर्ज देण्याचा १९८५ मध्येच करार केला. भारतीय कायदेनियम, पुनर्वसन व पर्यावरण विषयक बँकेचेच मार्गदर्शक सिद्धांत यांचे धडधडीत उल्लंघन होत असतानाही कर्ज चालूच ठेवले.

भारतातील व जगभरातील पुरोगामी, पर्यावरणवादी संघटनांनी व 'आंदोलनाने' वारंवार बँकेच्या नव-वसाहतवादी धोरणाचा विरोध केला. सरदार सरोवर बँकेच्या या धोरणाचे प्रतिक बनले.

जागतिक बँकेने माघार घेतल्यानंतर भारतातील नऊ प्रकल्पांमधूनही पुनर्वसनाच्या प्रश्न अंग काढून घेतले. तसेच सर्व देशांमध्ये, ज्या विकास प्रकल्पांना बँकेने कर्ज दिले त्यातील पुनर्वसनविषयक कामाची समीक्षा सुरू केली आहे. (इकॉनॉमिक टाईम्स (यू.एन.आय.) २०/९/९३ अहमदाबाद) नर्मदा खोऱ्यातील बाया-माणसांच्या लढाईची ही फलश्रुती होय.

## निष्पक्ष समीक्षा दल

आंदोलनाच्या दबावामुळे १९९१ मध्ये धरणाची फेरसमीक्षा करण्यासाठी बॅडफोर्ड मोर्स व थॉमस बर्जर यांच्या नेतृत्त्वाखाली निष्पक्ष समीक्षा दल नेमले. आठ महिन्यांच्या अभ्यासानंतर दलाने (मोर्स समितीने) स्पष्ट केले की हा प्रकल्प मुळातच दोषपूर्ण आहे. सर्व विस्थापितांचे न्याय्य पुनर्वसन अशक्य आहे व धरणाचे अपेक्षित लाभ मिळणार नाहीत. म्हणून बँकेने या प्रकल्पातून अंग काढून घेऊन प्रकल्पाचा फेरविचार करावा. धरणाचे बांधकाम थांबवून लोकांच्या संवादानेच पुढील कार्यवाही व्हावी.

या अहवालाने सरदार सरोवर वादाच्या भोवऱ्यात अडकले. बँकेच्या नोकरशाहीने जुजबी सुधारणा करून मदत पुढे ठेवण्याचे राजकारण सुरू केले तरी 'दाता' देशांनी या अहवालाची गंभीर दखल घेतली. २३ ऑक्टोबर ९२ ला बँकेच्या संचालक मंडळाची बैठक झाली.

सरकारला 'संशयाचा फायदा' देऊन सहा महिन्यांसाठी काही किमान अटी (बॅचमार्कस्) घातल्या. त्या पूर्ण करणे कर्ज जारी राहण्यासाठी आवश्यक होते. हे बेंचमार्कस अत्यंत तकलादू होते. त्यात अनेक पळवाटा नोकरशहांनी ठेवल्या. बेंचमार्कसमध्ये विस्थापितांची संख्या व वैशिष्ट्ये याची माहिती, म. प्रदेश व महाराष्ट्रात पुनर्वसन योग्य जमीन शोधणे,

तीनही राज्यांचा पुनर्वसन आराखडा तयार करणे, लाभक्षेत्राचा अभ्यास, कालव्याच्या, कॉलनीच्या विस्थापितांसाठी पुनर्वसनाची योजना जाहीर करणे यांचा समावेश होता.

धरणाचे बांधकाम सुरू झाल्यानंतर एवढ्या प्राथमिक गोष्टींची पूर्तता करण्याचीही क्षमता नव्हती. त्यावरून पुनर्वसन व पर्यावरणीय क्षतिपूर्ती अशक्य असल्याचे दिसले. शेवटी जगभरच्या बदनामीपासून वाचण्यासाठी व आय.एम.एफ.निधीवरील प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी सरदार सरोवराचे झेंगट टाळणे जरुरी होते. मार्च ९३ ला अखेर धरणातून अंग काढून घेण्याचे बँकेने ठरविले होते. अब्रू वाचवण्यासाठी भारतालाच आपला अर्ज मागे घेण्याची संधी दिली गेली. प्रकल्पाचे भवितव्य आणखीनच धूसर झाले.

## अमूल्य सांस्कृतिक वारसा

*भारतातील प्रागैतिहासीक व मानवाच्या अस्तित्वाचे पहिले पुरावे नर्मदा खोऱ्यात मिळाले. पुरातत्त्ववेत्त्यांच्यानुसार भारताच्या प्रागैतिहासिक काळातील अखंड साखळी नर्मदा खोऱ्यातील अभ्यासातूनच मिळू शकते. मात्र अभ्यासच झाला नाही. नावापुरत्या पुरातत्त्व मंजुऱ्या मिळविल्या गेल्या. नर्मदा खोऱ्यातील शूलपाणीश्वर, हाफेश्वर, कोठडा, ब्राह्मणगाव, नावाडा टोळी, महेश्वर, ओंकारेश्वर, जोगा किल्ला थोरले बाजीराव समाधी या सरदार सरोवर, नर्मदा सागर प्रकल्पांमुळे धोक्यात आल्या आहेत. हजारो मंदिरे, मशिदी आदिवासींचे देव - दानव, कथा, जिवंत लोक - संस्कृती धोक्यात येईल.*

## पर्याय नव्हे - योग्य उपाय

गुजरातच्या दुष्काळग्रस्त भागाच्या पाणी समस्येवर सरदार सरोवर हे उत्तर नाही. गुजरातेतील पाऊस व पाण्याच्या गरजा विकेंद्रित असल्याने त्यावरील उपाय पण विकेंद्रितच हवेत. गुजरातेतील जलसंपत्तीचे अपरिमित व्यापारीकरण, शोषण झाले. हे संतुलन पुन्हा आणावेच लागेल. गाव - तालुका पातळीवर नियोजन करावेच लागेल.

गुजरात जमीन विकास महामंडळाने कच्छ- सौराष्ट्राचा खोरे - उपखोरे

निहाय पाण्याचा संपूर्ण आराखडा तयार [illegible] आहे. वस्तुत: ०.८४ द. ल. ए. फू. पाणी मिळाले तर या भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. टेक्नॉलॉजी मिशनच्या अहवालाप्रमाणे याच्यापेक्षाही अधिक पाण्याचा साठा एकट्या कच्छमध्ये आहे. मात्र त्याचा उपयोगच होत नाही. महामंडळाचे उपसंचालक पी. एच. व्होरा यांच्या म्हणण्यानुसार कच्छ व सौराष्ट्रातून दर वर्षी १५ द. ल. ए. फू. पावसाचे पाणी वाहून जाते.

विकेंद्रित, छोट्या प्रकल्प, पाण्याचा सुयोग्य वापर यामुळेच या भागांचा प्रश्न सुटेल. तेथील पावसाच्या आधारेच असे अनेक प्रयोग गुजरातच्या अनेक भागात केले जात आहेत. माहिती उत्थान, आगाखान ग्रामविकास ' प्रतिष्ठान (सौराष्ट्र), विवेकानंद रिसर्च व ट्रेनिंग इंस्टिट्यूट, जनविकास (कच्छ) राजू पुरोहित व साथी, सद्‌गुरु वॉटर डेव्हलपमेंट फाऊंडेशन (बनासकांठा, पंचमहल) या सर्वांच्या कार्यामधून, कमी खर्चाचे, दीर्घकालीन, लवकर पूर्ण होणारे विकेंद्रित, लोकांच्या हातातील योजना अधिक लाभदायक होतात हे सिद्ध होते.

सध्या गुजरातच्या आठव्या पंचवार्षिक योजनेतील ८०% सिंचन बजेट एकट्या सरदार सरोवरातून खर्च होत असल्याने, या दुष्काळी भागासाठी अगदी सरकारी योजना असूनही पैसा नाही अशी स्थिती आहे. जलव्यवस्थापनाचा प्रश्न गुजरात सरकारने कधीच गंभीरपणे घेतला नाही. लघुपाणलोट क्षेत्र विकासासाठी ७ व्या योजनेत फक्त ५४ कोटी रुपये ठेवले. त्यातील ५०% च रक्कम खर्च झाली. ८ व्या योजनेत हीच रक्कम ५० कोटींवर आली. पाईपलाईनच्या घोषणा केल्या व रद्द केल्या जातात. यावरून शासनकर्ते किती स्वार्थीपणाने या प्रश्नाकडे बघतात हे समजेल.

अनेक तज्ज्ञ, निवृत्त अभियंते, सामाजिक कार्यकर्त्यांनी धरणाची उंची कमी करून बुडित क्षेत्र व विस्थापनाचे प्रमाण कमी करण्याचे अनेक प्रस्तावही ठेवले आहेत. सरदार सरोवर काही गुजरातच्या पाणी प्रश्नावरील तोडगा नव्हे. यात पुनर्विचारास वाव आहे हे यावरून दिसून येते.

१९९१ मध्ये आंदोलनास मिळालेल्या राईट लाइव्हलीहूड पुरस्कार रकमेचा सार्वजनिक न्यास करून कच्छ सौराष्ट्रासारख्या दुष्काळग्रस्त भागांच्या पाणी व भूमी नियोजनाचा आराखडा बनविण्यासाठी त्यातील काही भाग निश्चित केला आहे.

## जन - आंदोलनाची संघर्ष यात्रा

१९८५ पासून सरदार सरोवर बुडित क्षेत्रातील गावे संघटित होऊ लागली. महाराष्ट्रातील ३३ गावात 'नर्मदा धरणग्रस्त समितीचे संघटनकार्य सुरू झाले. आदिवासी समाजाच्या जीवनाचे, साधनंसपत्तीचे व ते जमवण्याचे योग्य आकलन व मूल्यांकन झाले नाही हे उमजले. यांच्या भरपाईची शक्यता नाही हे सतत प्रश्न विचारून व माहिती, अनुभवांच्या आधारावर जाणवले. या विस्थापनामुळे आदिवासींचे जीवनच उद्ध्वस्त होईल याची खात्री पटली. १९८७ मध्ये निमाड (म. प्र.) मधील गावात 'नर्मदा घाटी नवनिर्माण समितीचे' संघटन कार्य सुरू झाल्यावर तर विस्थापनाचे व्यापक परिणाम व पुनर्वसनाची अशक्यता लक्षात आली. १९८५ मध्ये केंद्र सरकारची प्रकल्पाला मंजूरी नसतानाही जागतिक बँकेने कर्ज मंजूर केल्यावर जागतिक बँकेलाही सवाल करणे सुरू झाले.

विस्थापनाचा आवाका, पुनर्वसनाची अशक्यता, ज्यासाठी विस्थापन व हजारो कोटींचा खर्च, पर्यावरण विनाश होणार त्या प्रकल्पाची लाभकारिता, मुलभूत आराखडा, अध्ययन यांची विपरित अवस्था या सर्वांकडूनच खात्री पटली की काही मूठभरांसाठी जागतिक बँक व सत्ताधारी वर्गाच्या दबावामुळे असा विनाशकारी प्रकल्प आदिवासी शेतकरी समाजावर व राष्ट्रांवर लादला जात आहे. १४ मे १९८८ ला केवडिया कॉलनीत नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीबरोबर तीनही राज्यातील जनसंघटनांच्या प्रतिनिधींबरोबर आठ - दहा तास जोरदार चर्चा झाल्यावर तर या विनाशकारितेबद्दल खात्रीच पटली. १९८८ च्या ऑगस्टमध्ये तीनही राज्यात तालुक्याच्या ठिकाणी लोकमेळाव्यात धरणाला संपूर्ण विरोध जाहीर करण्यात आला.

याच सुमारास देशभरात सामाजिक, पर्यावरणीय संघटना, व्यक्ती, तज्ज्ञ, वैज्ञानिक, अर्थशास्त्रज्ञ इत्यादींना हा मुद्दा पटला होता. व नर्मदा खोऱ्यातील जनआंदोलनाला समर्थन देण्यासाठी व धरणाला विरोध करण्यासाठी दिल्ली, मुंबई, इंदूर, अहमदाबाद, धुळे, पुणे, औरंगाबाद, कलकत्ता इ. ठिकाणी समर्थक समूह संघटित झाले.

छत्तीसगढ मुक्ती मोर्चा, भोपाळ गॅस पीडित महिला उद्योग संगठन, म. प्र. स्वयंसेवी संस्था संघ, प्रयोग, पी. यू. सी. एल. (म. प्र.) गंगामुक्ती आंदोलन, सुवर्णरेखा कोयलकारो धरणविरोधी संघर्ष, झारखंड पीपल्स पार्टी जनमुक्ती आंदोलन (बिहार) आंध्रप्रदेश सिविल लिबर्टीज कमिटी गोंडवन संघर्ष समिती, मान्य प्रांत संघर्ष, दलित संघटना, कर्नाटक राज्य रयत संघ, स्वयंसेवी संस्था संघ, आदिवासी संगमम् (कर्नाटक) नॅशनल फिशवर्कर्स्

फोरम, केरळ साहित्य शास्त्र परिषद, अनेक पर्यावरणीय संघटना (केरळ) चिलीका बचाओ आंदोलन (ओरिसा) राजस्थान, बंगालमधील शेतकरी व शेतमजूर संघटना, बंधुआ मुक्ति मोर्चा, ॅशनल कंस्ट्रक्शन वर्क्स फेडरेशन (दिल्ली) शोषित जनआंदोलन, सोशॅलिस्ट फ्रंट, नारी समता मंच, छात्रभारती, युवाबाँबे नॅचरल हिस्ट्री सोसायटी अनेक सामाजिक पर्यावरणवादी संघटना (महाराष्ट्र) अशांनी सतत सक्रिय सहभाग दिला गुजरातेतही सरदार सरोवराच्या वास्तव रूपाबद्दल लाभांच्या खोट्या आश्वासनांबद्दल १९८८ पासून प्रचार जागृतीचे काम सुरू आहे. 'लोक अधिकार संघ' परिवर्तन व इतर संघटनांनी त्यात पुढाकार घेतला. अहमदाबाद (१९८८ डिसें.) राजकोट (एप्रिल १९८९) बैठकीनंतर आता कच्छ, सौराष्ट्रात 'आंदोलनाच्या' कार्यकर्त्यांच्या अनेक बैठका होऊन समर्थक समूह जामनगर व भावनगर इत्यादी ठिकाणी उभे राहिले. दुष्काळी भागांसाठी पर्यायी पाणीनियोजन जरूरी आहे, अशी मागणी घेऊन सरदार सरोवरास विरोधाचे आवाज उठत आहेत. या प्रश्नाला आता राजकीय स्वरूप येत असून विधानसभेत गुजरात शासनाला या प्रश्नी अनेक वेळा बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला.

सौराष्ट्रातील व उत्तर गुजरातेतील आमदार विधानसभेत म्हणतात की सरदार सरोवराच्या एकंदर खर्चाच्या काही टक्केच खर्च करून त्यांच्या प्रदेशातील पाण्याचा प्रश्न सुटेल. लघुजलसंग्रहण क्षेत्र विकास, व लहान योजना यांनीच हा प्रश्न सुटेल. कच्छ मध्ये भूज येथे १६ जून ९३ रोजी ३५,००० चा भव्य मोर्चा निघून नर्मदा योजनेमध्ये कच्छवर अन्याय झाल्याचे जाहीर केले गेले. कच्छ जलसंकट निवारण परिषदेने पाण्याचा वाटा वाढवून मागितला व कच्छमध्ये कायमस्वरुपी उपाय म्हणून जलसंधारण योजना हाती घेण्याचे आवाहन केले. गुजरात एकसंघपणे सरदार सरोवरामागे आहे हे सत्ताधाऱ्यांनी तयार केलेले चित्र आता भंग पावत आहे. असा एकसंघतेचा देखावा आता फक्त फॅसिस्ट मार्ग वापरूनच करता येईल.

## दडपशाही बदनामी

या प्रश्नी सत्य बाहेर येऊ नये व विरोधाचे स्वर बाहेर येऊ नयेत म्हणून गुजरात, म. प्र. व महाराष्ट्र शासनांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. गुजरातेत सरकारी व धरणसमर्थक संघटनांनी, भाषिक वृत्तपत्रांनी

बदनामी, प्रांतीयवाद, बिनबुडाच्या आरोपांची राळ उडवली. 'धरण बांधले जात असून तुम्ही बुडणार' या मानसिक धमकचा सतत उपयोग, लाचलुचपत, सर्रास दडपशाही अत्याचार.... सर्व मार्गांचा उपयोग लोकांना दबविण्यास व तोडावयास केला जात आहे.

१९९० पासून मध्यप्रदेशात श्री.सुंदरलाल पटवा यांचे शासन आल्यापासून जनआंदोलनाविषयी अत्यंत अनुदार वृत्तीचे प्रदर्शन सुरू झाले. घोडेस्वार पोलिसांकरवी लाठीहल्ला, महिलांना व कार्यकर्त्यांना असभ्य वागणूक, मारहाण, गावागावात दहशत फैलावणे अटकसत्र इत्यादी मार्गांनी लोकांना गावे सोडण्यास भाग पाडण्याची शिकस्त केली गेली. १९९२ मार्च - एप्रिलमध्ये एखाद्या साध्या निमित्तापायी शेकडो पोलिस, मणिबेलीत घालून दहशत निर्माण करणे, मारहाण, अटक, अत्याचार करणे हा याचाच भाग आहे.

## विकासाचे राजकारण

आंदोलनामुळे आलेल्या जागृतिमुळे समाजजीवनात इतर पातळ्यांवरही परिवर्तनाचे वारे वाहू लागले. लोकांना स्वतःच्या निर्णयाविषयी, शक्तिविषयी आत्मविश्वास आला. तथाकथित 'सार्वजनिक हिताच्या' निर्णयालाही आव्हान देता येते ही जाणीव आली, व 'कुणाचा लाभ कुणाचा बळी' हा मूलभूत सवाल करण्याची गरज रुजत गेली. पक्षीय राजकारण, पोलिस प्रशासन याबद्दलची गूढता, दहशत कमी होत जाऊन गावाची समूहाची शक्ती याची जाणीव कमी अधिक प्रमाणात वाढीस लागली. आदिवासी व बिगर आदिवासी कार्यकर्त्यातील भेद कमी होऊन परस्परांबद्दल आदर व सहकार्याची भावना रुजली. निमाडसारख्या पारंपारिक भागात महिला मोठ्या प्रमाणावर आंदोलनात उतरल्या, रस्त्यावर आल्या, त्याचा कौटुंबिक व सामाजिक जीवनातील अन्य मूल्यांवरही परिणाम होणे साहजिकच आहे. युवा संमेलने, महिला परिषदा, डॉ. आंबेडकर जयंती यासारखे उपक्रम सुरू झाले. नवी विचारधारा घेऊन, विकास व राजनीतीची नवी व्याख्या घेऊन गावागात नेतृत्व पुढे आले. केशव वसावे, वेस्ता पाडवी, रामा पाडवी, नूरजीभाई, राण्याभाऊ, मांगलिया, उल्याभाऊ, महेश पटेल, मनसाराम भाई, सितारामभाई, इस्लामभाई, देवराम कनेरा, यांच्याबरोबरच रेहमत, महेश, छोगालाल, सुरेश, रमेश, भगवानभाई, मुकेश यांच्यासारखा नवा, उत्साही कार्यकर्त्यांचा समूह आंदोलनाची धुरा सांभाळत आहे.

देशभरातील जनसंघटना, पर्यायी विकासाचे काम करणाऱ्या संस्था, समूह यांच्याशी जिवंत संपर्क व समन्वयाची प्रक्रिया प्रथम पासूनच

आहे. या प्रक्रियेतूनच २८ सप्टेंबर १९८९ रोजी हरसूद येथे देशभरातील शेकडो संघटना-संस्थांचा 'राष्ट्रीय मेळावा' होऊन विनाशकारी विकासनीतीविरुद्ध राष्ट्रीय संघर्ष छेडण्याची घोषणा करण्यात आली व जनसंघटनांच्या कामाचा समन्वय करण्याची प्रक्रिया सुरू झाली. 'जनविकास आंदोलन' 'भारत जन आंदोलन' या आघाड्यात सतत समन्वय राहिला आहे. राजकीय पक्ष, संघटना यांच्याशी सतत संपर्क साधण्याचा प्रयत्न राहिला आहे. विकासाच्या प्रश्नावर पक्ष संघटनांनी, राजकीय नेते यांनी भूमिका घ्यावी यासाठी त्यांच्यापर्यन्त माहिती, चर्चा, वादविवाद यांच्यामार्गाने संवाद होत राहिला आहे.

भारतातील प्रमुख राजकीय पक्ष सरदार सरोवराच्या विरोधात पर्यायाने विकासाच्या पर्यायी प्रारुपाच्या बाजूने स्पष्ट भूमिका घेण्यापर्यन्त अजून आले नाहीत. मात्र अनेक लहान डावे गट, पक्ष, संघटना (उदा. इन्कलाबी कम्युनिस्ट पार्टी, कम्युनिस्ट गदर पार्टी, इंडियन पीपल्स फ्रन्ट, सोशॅलिस्ट फ्रन्ट) यांनी पूर्वीपासूनच आंदोलनाला सर्व मुद्यांवर पाठिंबा दिला. या खेरीज अन्य 'राष्ट्रीय' पातळीवरील पक्षातील अनेक नेते, आमदार खासदार, विचारवंत, व्यक्तिगतरित्या सवाल उठवित, सहानुभूती दाखवत आहेत. सर्वच पक्षांबरोबर संवाद व चर्चा चालू होत्या व आहेत. कधीतरी विकासाच्या संदर्भात त्यांनी भूमिका घ्यावी असे सतत प्रयत्न केल्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. जनता दल कम्युनिस्ट पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट, काही कामगार संघटना पीपल्स सायन्स मुव्हमेंट यांनी 'पुनर्विचाराच्या' प्रक्रियेचे स्वागत केले. ही राजकीय प्रक्रिया आणखी बळकट करण्याची गरज आहेच.

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, गॅट डंकेल प्रस्तावाच्या रूपात येणाऱ्या नव - वसाहतवादाविरुद्ध देशभरातील विरोधी चळवळींना 'नर्मदा बचाओ आंदोलनाने' साथ दिली आहे.

## पुनर्विचाराच्या दिशेने : एक आढावा

गेल्या आठ वर्षातल्या नर्मदा खोऱ्यातील जन - आंदोलनामुळे उभे केलेले मुद्दे शासनास अप्रत्यक्षपणे मानावेच लागले. विस्थापन, आर्थिक लाभहानी, प्रत्यक्ष लाभकारिता याबद्दल आंदोलनाने उपस्थित केलेले मुद्दे व आकडे आज सत्ताधारी मान्य करीत आहेत. पुनर्विचाराची मागणी मान्य करणे म्हणजे आंदोलनाच्या मुद्यांना मान्यता देणेच होय.

अशा प्रकल्पांमागील विकास धोरणालाच आव्हान दिले गेले. विस्थापन,

आर्थिक लाभहानी, पर्यावरणीय चिरंतनता, सामाजिक न्याय हे मुद्दे सुटे पाहता येणार नाहीत. त्यांच्यावरील उपाय योजनाही सुटेपणाने करता येत नसून समग्रदृष्टीनेच त्यांच्याकडे पहावे लागेल ही जाणीव दृढ झाली.

राज्याराज्यांमधील वाद पुन्हा उफाळून येत आहेत. म. प्र. व गुजरातेत खर्चाचा वाटा, पाण्याचा वाटा (सिंचन उप - मार्ग) हे वाद गंभीर बनणार आहेत. सरदार सरोवराचा म. प्र. ला फायदा नाही, उलट सर्वात जास्त झळ तेथे आहे ही भावना तेथील राजकीय, सामाजिक जीवनात बळावत चालली आहे. १९९० पासूनच पुनर्विचाराच्या दृष्टीने काही अडखळती पावले पडू लागली. ७ मार्च १९९० ला २८ तासांच्या रस्ता रोकोनंतर म. प्र. च्या मुख्यमंत्र्यांनी पुनर्विचाराची मागणी केंद्रासमोर ठेवून राज्याच्या पातळीवर लोक संघटनेच्या सहकार्याने पुनर्विचाराची प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले. मात्र त्यानंतर मुख्यमंत्री श्री. पटवा यांनी शब्द फिरवला. महाराष्ट्रातही २८ मार्च ते ५ एप्रिल १९९० दरम्यान धरणे व बेमुदत उपोषणाच्या वेळी तत्कालिन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी अधिकृत घोषणा केली की, लोकांच्या सहमतीने पुनर्वसनाचा आराखडा जोपर्यंत तयार होत नाही तोपर्यंत महाराष्ट्राच्या एक इंच जमिनीवर पाणी येईल, असे धरणाचे बांधकाम होऊ देणार नाही. आज मात्र हे आश्वासन पोकळ ठरले आहे.

१७ मे १९९० मध्ये दिल्लीतील पाच दिवसाच्या १५०० लोकांच्या धरण्याच्या अखेरीस तत्कालीन पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांनी पुनर्विचाराचे आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी उच्च अधिकाऱ्यांच्या एका पथकाशी पुनर्विचाराचे मुद्दे व त्याबद्दलची प्रक्रिया यांच्याबाबत चर्चा झाली. मात्र राजकीय दबाव व नोकरशाहीची भूमिका यामुळे ही प्रक्रिया पुढे जाऊ शकली नाही.

धरणाला संपूर्ण विरोध असला तरी प्रारंभी त्याच्या पुनर्विचाराची (Review) सुरुवात व्हावी अशी भूमिका आंदोलनाने नेहमीच घेतली आहे. त्यासाठी पुनर्विचाराचे मुद्दे व प्रक्रिया अनेकदा लिखित स्वरूपात दिल्या आहेत.

## अजूनही विनाश टाळता येईल

सरदार सरोवराचे काम थांबवून थोडे थंड डोक्याने, बदललेल्या स्थितीत, बदललेल्या लाभहानीच्या व वैज्ञानिक तथ्यांच्या आधारावर निश्चित कालावधीत पुनर्विचार करावयास अजूनही वाव आहे.

धरणावर अंदाजे रु. २६०० कोटी खर्च झाले तेही (अजूनही) कोणत्याही वैध मंजूरीशिवाय आणि त्यातही बराच खर्च हा प्रशासनिक व सुविधा (गाड्या, नोकरचाकर, गेस्ट हाऊस, रस्ते, कॉलनी) यावरच झाला आहे. मुळात पुढील किमान २५,००० कोटी रुपये वाचवायचे असतील तर हे काम आताच थांबवून धरणाच्या विस्थापन, पर्यावरण, आर्थिक पैलूंवर लाभहानी, पर्याय यांच्या संदर्भात पुनर्विचार होणे क्रमप्राप्त आहे.

नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाच्या १९७९ च्या निवाड्यात अशा पुनर्विचारास वाव आहे. काही बाबतीत मतभेद असल्यास चारही संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना जॉईंट रिव्ह्यू कौन्सिल मध्ये एकमताने निर्णय होऊनच काम पुढे जाऊ शकते. म्हणजे या प्रकरणी महाराष्ट्रासारखे एक राज्यदेखील पुनर्विचाराची मागणी करू शकते. १९८१ मध्ये म. प्र. व गुजरातच्या मुख्यमंत्र्यांत एक गुप्त करार होऊन त्यानुसार विस्थापनाचा प्रश्न आवाक्याबाहेर गेला तर धरणांबद्दलचा पुनर्विचार केला जाईल असे सूचित केले आहे.

न्यायाधिकरणाचा निर्णय म्हणजे ब्रह्मवाक्य नव्हे. जिथे बदलती परिस्थिती, वास्तविकता, जन-भावना यांची दखल घेऊन राज्यघटना देखील बदलली जाऊ शकते, तेथे या धरणासंबंधी सर्व बाबी आता पूर्णपणे विपरित सिद्ध झाल्या असताना पुनर्विचार का होऊ नये? धरणाचे लाभ दुष्काळग्रस्त भागांना नाहीत, खर्च आटोक्याबाहेर आहे, विस्थापनाचा अंदाजच नाही, पुनर्वसन अशक्य आहे. जमीन पाणी, जंगल यांची अपूरणीय क्षती होणार अशावेळी एखादे धरण प्रतिष्ठेचा मुद्दा करून देशाचे नुकसान करून घेण्याऐवजी मुलभूत मुद्यांवर जनसंघटनेच्या सहाय्याने पुनर्विचार करणे हेच देशहिताचे आहे. अपरिहार्यतेकडे ढकलले जाणारे धरणाचे बांधकाम बंद ठेवून असा पुनर्विचार होणे हेच शहाणपणाचे आहे.

## नर्मदा आंदोलनातील पडाव

| | | |
|---|---|---|
| १९४६ - ६० | : | नर्मदेतील पाण्याची शक्यता अजमावून संभाव्य योजनांचा विचार. |
| १९६० | : | नियोजन मंडळाकडून नवागाव येथील १६२ फूटाच्या धरणासाठी मंजुरी जरुरी पडल्यास ३२० फुटापर्यंत वाढवण्यास |

| | | |
|---|---|---|
| | | परवानगी. |
| १९६० - ६१ | : | केवडिया व आसपासच्या गावातील जमिनी कॉलनीसाठी घेतल्या |
| १९६५ | : | खोसला आयोगाचा अहवाल (धरण ५०० फुटांचे असावे) म. प्रदेश, महाराष्ट्राला अमान्य. |
| १९६९ | : | नर्मदा पाणी तंटा न्यायाधिकरण जाहीर. |
| १९७९ | : | न्यायाधिकरणाचा निकाल जाहीर. |
| १९८१ ऑगस्ट | : | म. प्रदेश व गुजरातमध्ये गुप्त करार 'विस्थापितांची समस्या सोडवण्यास सरदार सरोवर, नर्मदा सागर प्रकल्पांबाबत विविध पर्यायांचा विचार केला जाईल. |
| १९८५ मे | : | जागतिक बँकेतर्फे ४५० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज |
| १९८६ फेब्रुवारी | : | नर्मदा धरणग्रस्त समितीची स्थापना |
| १९८६ | : | धडगाव येथे मागणी परिषद. पैशाच्या भरपाईला विरोध. म.प्रदेशमध्ये संघटन सुरू. |
| १९८७ | : | एप्रिलमध्ये तिन्ही राज्यांचे मुख्यमंत्री, पंतप्रधान बैठक, प्रकल्पास मंजुरीची गरज हा निर्णय. |
| जून, सप्टेंबर १९८७ | : | केंद्रीय पर्यावरण विभागातर्फे सशर्त मंजुरी |
| डिसेंबर १९८७ | : | गुजरात शासनाचे पुनर्वसनविषयक ठराव |
| फेब्रुवारी १९८८ | : | म. प्रदेशच्या नर्मदा प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. वर्मा यांचा 'सरकारची पुनर्वसनाची तयारी नसल्याने' राजीनामा. |
| १४ मे १९८८ | : | केवडियात नर्मदा कंट्रोल ऑथॅरिटीच्या अधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चा. |
| १८ ऑगस्ट १९८८ | : | तीनही राज्यांच्या जनसंघटनांनी तहसील कार्यालयावर मोर्चे नेऊन धरणास संपूर्ण विरोध करणारे पत्रक दिले. |
| २ - ३ सप्टेंबर १९८८ | : | सरदार सरोवरास स्थगितीसाठी मुंबई येथे धरणे. |
| १२ सप्टेंबर १९८८ | : | देशभरातील ३०० नामवंत व्यक्तिंनी सरदार सरोवर पुनर्विचारासाठी पंतप्रधानांना |

| | | |
|---|---|---|
| | | आवाहन केले. |
| ३० जानेवारी १९८९ | : | धरणस्थळाच्या आसपासच्या गावात लागू केलेल्या ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट' ला आवाहन दिले गेले. |
| २२ फेब्रुवारी १९८९ | : | आठ हजारावर लोकांनी धरणस्थळावर सत्याग्रह केला. |
| २८ सप्टेंबर १९८९ | : | हरसूद येथे 'राष्ट्रीय संकल्प मेळावा' होऊन विनाशकारी विकासाविरुद्ध संयुक्त लढ्याचा संकल्प झाला. |
| ३१ डिसेंबर १९८९ | : | हाफेश्वर येथे नर्मदा तटावर आदिवासींची धरणविरोधी युद्धाची घोषणा झाली. |
| १९९० | : | धरणासंबंधी कार्यालये बंद करण्याची मोहीम सुरू झाली. |
| ६ मार्च १९९० | : | खलघाट येथे मुंबई - आग्रा महामार्गावर २८ तासांचे 'रास्ता रोको' आंदोलन झाले व म. प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत आश्वासनानंतर ते समाप्त झाले. |
| २८ मार्च ते ५ एप्रिल | : | दरम्यान मुंबईत आदिवासींचे धरणे झाले. चार कार्यकर्त्यांनी उपोषण केले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर ते संपले. |
| १६ ते १९ एप्रिल | : | दरम्यान दीडशे लोकांनी दिल्लीतील केंद्र शासनाच्या प्रत्येक संबंधित कार्यालयाला अंतिम इशारा दिला. |
| १४ ते १७ मे १९९० | : | दिल्लीत पंतप्रधानांच्या घरासमोर दीड हजारांचे धरणे त्यांच्याशी चर्चा. आंदोलनाच्या मुद्यांचे महत्त्व मान्य करून पुनर्विचाराची तयारी दर्शविली मात्र त्यात प्रगती नाही. |
| १ ऑगस्ट १९९० | : | महाराष्ट्रातल्या विस्थापितांनी त्यांना देऊ केलेली तळोद्याची जंगल जमीन नाकारली. |
| १९९० | : | तीनही राज्यात दडपशाही. |

## जनविकास संघर्ष यात्रा

२५ डिसेंबर १९९० ला राजघाट (म. प्र.) येथून हजारो स्त्री-पुरुष आपला शिधा, अंथरुण, कपडे घेऊन धरणाच्या दिशेने चालायला लागले. नर्मदा खोऱ्याचा जगण्याचा हक्क शाबित करण्यासाठी, संघर्षात आपल्या जीवनाची आहुतीही देण्याचा संकल्प करणारे 'समर्पित दल' घोषित झाले. सरदार सरोवराचा लोकसहभागाने संपूर्ण पुनर्विचार व्हावा, व तोपर्यंत धरणाचे अपरिवर्तनीय ठरणारे काम थांबवावे अशी मागणी घेऊन ही लोक-दींडी निघाली. सात दिवस शंभरावर कि. मी. अंतर ते चालले. सातपुडा व विंध्यामधून आदिवासी बाया-माणसं, पोरं, धान्य डोक्यावर ठेवून १०० - १५० कि. मी. पहाडी चालून यात्रेत येऊन मिसळली. गुजरात सरकारने उद्दाम सत्तेचे प्रदर्शन करून पोलिसांच्या व काही लाचार लोकसंघटनांच्या मदतीने हा जनप्रवाह अडवला. राज्ययंत्रणांविरुद्ध लोक, हितसंबंधी स्वार्थी विरुद्ध आदिवासी- किसान असे स्पष्ट ध्रुवीकरण होते. अहिंसात्मक आंदोलनाचा मार्ग स्विकारल्यामुळे यात्रेने गुजरात - मध्यप्रदेश सीमेवर चांदपूरनजिक धरणे धरले. हजारो आदिवासी, शेतकरी कडाक्याच्या थंडीत, स्वतःच्या धान्यावर, उघड्या आकाशाखाली ३७ दिवस राहिले. त्यांची एक वस्तीच झाली. 'संघर्ष ग्राम'

मेधा पाटकर, शांताबाई, लक्ष्मीबाई, देवरामभाई, खाजाभाई, रामभाऊ, मंथुरमोहन व मेघनाथ यांनी बेमुदत उपोषण सुरू केले. बरोबरीला ५० सहकारी चोवीस तासांचे लाक्षणिक उपवास करीत. मथुरभाई, शांताबाई, रामभाऊ इस्पितळात दाखल झाले. सरकार ढिम्म. उलट दडपशाही, बदनामी यांचा गुजरात, म. प्र. सरकारने कहर केला. केंद्र उदासीन. मात्र नर्मदेची ही चिवट झुंज देशाच्या कानाकोपऱ्यात पसरली. शेकडो संघटना, व्यक्ती पाठीशी उभ्या राहिल्या. गावकऱ्यांची व सर्व साथीदारांनी उपवास करणाऱ्यांना साकडे घातले. २२ दिवसानंतर २८ जानेवारी १९९१ ला उपवास मागे घेतले आणि यात्रा ३० जानेवारीला महात्मा गांधींच्या स्मृतिदिनी त्यांच्या सिद्धांतांना मूर्त रूप देण्यासाठी खोऱ्यात परतली. एकच निर्धार घेऊन आवाज होता.

''शासनावाले' सुनलो आज । हमारे गांव में हमारा राज''

| | | |
|---|---|---|
| १९९१ जानेवारी | : | सरदार सरोवराची निष्पक्ष समीक्षा करण्यासाठी निष्पक्ष पथक पाठविण्याची जागतिक बँकेच्या अध्यक्षांची घोषणा |
| १९९१ जून, ऑगस्ट, सप्टेंबर | : | मणिबेली सत्याग्रह (स्वतंत्र विभाग) |
| १९९१ ऑक्टोबर | : | आंदोलनाला राईट लाइव्हलीहूड पुरस्कार (पर्यायी नोबेल पुरस्कार) घोषित. 'निष्पक्ष समीक्षा दल' भारतात दाखल. |
| १९९१ डिसेंबर | : | ९ डिसेंबर केशवभाऊ वसावेंनी आंदोलनातर्फे राईट लाइव्हलीहूड पुरस्कार स्टॉकहोममध्ये स्विकारला. पुरस्काराची रक्कम कच्छ सौराष्ट्रासारख्या दुष्काळग्रस्त भागांच्या पाणी समस्या सोडविण्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी व अन्य प्रयोजनांसाठी देण्याचे घोषित झाले. आंदोलनासाठी पुरस्काराचा पैसा न वापरण्याची घोषणा. |
| ३० डिसेंबर १९९१ | : | मणिबेलीच्या २८ प्रकल्पग्रस्तांनी आपल्या पुनर्वसन जमिनीचे पट्टे धुळे जिल्हाधिकाऱ्यांना परत केले. |
| १९९२ मार्च-एप्रिल | : | मणिबेली कारवाई (स्वतंत्र विभाग) |
| मे १९९२ | : | मेधा पाटकर यांना 'गोल्डमन पर्यावरण पुरस्कार' घोषित. |
| १८ जून १९९२ | : | निष्पक्ष समीक्षा दलाचा अहवाल प्रसिद्ध. |
| १ व २ ऑगस्ट १९९३ | : | दिल्ली येथे 'सरदार सरोवर विकास धोरण जागतिक बँक' यावर राष्ट्रीय परिसंवाद बँकेविरुद्ध मोहिमेसाठी विशेष गट स्थापन. |
| ऑगस्ट, सप्टेंबर | : | धरणसमर्थक गट, उच्च अधिकारी, मंत्री अनेक दाता देशांच्या दौऱ्यांवर, जागतिक बँकेचे कर्ज चालू रहावे यासाठी धडपड. |
| जून ते सप्टेंबर १९९२ | : | मणिबेली - वडगाम सत्याग्रह |
| २३ ऑक्टोबर १९९२ | : | अनेक आक्षेपांना न जुमानता, जागतिक बँकेच्या संचालक मंडळाने ४२ विरुद्ध ५८ मतांनी धरणाचे कर्ज सहा महिन्यांसाठी चालू ठेवण्याचे मान्य केले. भारत सरकारला 'संशयाचा फायदा' |

| | | |
|---|---|---|
| | | दिला गेला. |
| ऑक्टोबर - डिसेंबर १९९२ | : | बँकेच्या शर्ती पूर्ण करण्यासाठी लाठीमार, अटकसत्र, लाचलुचपत, भ्रष्टाचार, बनावट 'शिबिरे' यांना ऊत. |
| डिसेंबर १९९२ | : | महाराष्ट्रातील गावांना ३० जानेवारी ९३ पर्यन्त हटण्याचा नोटिसा व काहींना हटण्याच्या व जमिनीची निवड करण्याच्या एकत्रच नोटिसा. |
| जानेवारी १९९३ | : | मणिबेली मार्गे महाराष्ट्रातील गावांमध्ये रस्ता करण्याच्या जबरदस्तीला विरोध. |

## ३० जानेवारी ते ३ मार्च ९३ लोकनिवाडा

*नर्मदा खोऱ्यातील लोकमताचा आदमास व लोकनिर्धार अधिक बळकट करण्यासाठी 'लोकनिवाडा' ही अभिनव मोहीम चालली. एका महिन्याहून अधिक काळ, कार्यकर्ते, गावकरी, समर्थक, संघटनांचे प्रतिनिधी, मान्यवर निरीक्षक यांचे जत्थे नर्मदेच्या दोन्ही तटावरील महाराष्ट्र, म. प्रदेशची आदिवासी गावे, निमाडच्या सखल प्रदेशातील गावे यातून फिरले. बैठका घेऊन धरणासंबंधिच्या दोन्ही बाजू, सरकारची दमन व इतर तयारी व आंदोलनाची भूमिका शक्ती इत्यादी स्पष्टपणे मांडले गेले. महिलांशी अलग बातचीत केली गेली. ज्यांना पुनर्वसित व्हावयाचे आहे त्यांचेही म्हणणे ऐकले. अखेर ज्यांना सर्व आव्हानांना तोंड देत धरणाच्या विरोधात लढायचे आहे त्यांची खानेसुमारी झाली. ज्यांचा न हटण्याचा निर्धार आहे त्यांच्या घरावर 'हम नही हटेंगे, बांध नही बनने देंगे' च्या पाट्या लावल्या. एकंदर ११५१३ हून अधिक प्रकल्पग्रस्त कुटुंबानी धरणाला विरोध करण्याचा निर्धार व्यक्त केला. ४ मार्च रोजी राजघाट (बडवानी) व ५ मार्च मणिबेली येथे जनसंकल्प घोषित केला.*

## मणिबेलीतील लढा

मणिबेली सत्याग्रहामुळे नर्मदा खोऱ्यातील संघर्षाला नवे वळण मिळाले. एकीकडे शासन धरण 'अपरिहार्य' करीत जात आहे. लोक हटले नाहीत, सर्व सवाल अनुत्तरीत आहेत. तरीही धरणाचे बांधकाम वाढवून लोकांना बुडण्याचा धाक दाखवून हटावयास भाग पाडावयाचे हा कावा आहे. सरकार किंवा हितसंबंधी स्वार्थी हा प्रकार नेहमीच करतात. या सरकारी दहशतवादाला प्रत्युत्तर देण्याचे निश्चित केले गेले.

मणिबेली या महाराष्ट्रातील पहिल्या धरणग्रस्त गावात १९९१ च्या जून पासून बुडिताच्या विरोधात नर्मदा खोऱ्यातील लोकांचा सत्याग्रह सुरू झाला. सत्याग्रहींपैकी 'समर्पित दलाचा' पहिला जत्था बुडितात येणाऱ्या जमिनीच्या पहिल्या तुकड्यावर बुडिताला आव्हान देत समर्पित होण्यासही तयार होता. मात्र त्यावर्षी पाऊसच सरासरीपेक्षा अत्यंत कमी झाल्याने बुडिताची शक्यता निर्माण झाली नाही. ऑगस्ट ९१ मध्ये महाराष्ट्रातील ३३ गावांमध्ये नर्मदा धरणग्रस्त समितीसाठी बंदी आदेश लागू केला गेला. ३ ऑगस्ट रोजी ६३ जणांना अटक केली. मंदिरात पोलीस कॅम्प केला.

या सत्याग्रहामुळे मात्र, नदीपात्रातील धरणाचे बांधकाम जानेवारी १९९२ पासून सुमारे ८ ते १० महिने धीमे ठेवण्यात आले होते. जोपर्यंत गावे पूर्णपणे पुनर्वसित होत नाहीत तोपर्यंत गावे धरणात बुडू नयेत हा न्यायाधिकरणाचा आदेशच आहे. त्यामुळे धरणाचे कार्य अप्रत्यक्ष रित्या थांबलेच असे होईल. म्हणून काहीही करून मणिबेली व नजिकची गावे १९९२ च्या मॉन्सूनपूर्वी हटविणे जरुरीचे झाले होते.

मणिबेलीला हटविण्यासाठी २६ मार्च १९९२ रोजी शेकडो पोलीस मजूर, धरणसमर्थक गटांचे लोक, सरकारी अधिकारी गावात घुसले. ज्यांना गावातून हटायचे आहे त्यांना 'मदत' करण्यासाठी ही कार्यवाही होती, असा आव आणला गेला. वस्तुतः ज्यांना हटण्याची इच्छा होती, त्यांना कधीच विरोध झाला नव्हता, उलट त्यांना गावाबाहेर जाण्यासाठी मदतच देऊ केली होती. तरीही २६ मार्चला लोकांच्या स्वाभिमानी 'कणा' मोडण्यासाठी मणिबेलीवर अक्षरशः आक्रमण करण्यात आले.

२६ मार्च पासून २३ एप्रिलपर्यन्तच्या मणिबेली कारवाईत सशस्त्र पोलीस, ठेकेदारांचे गुंड अनेक वेळा गावात घुसले, तोडफोड, मारहाण दहशत बसवली किमान सहा वेळा ३०० हून अधिक जणांना अटक झाली. किमान ३५.४० जणांना जखमा झाल्या. निर्दय लाठी हल्ल्यात वृद्ध, स्त्री-पुरुष, मुले सापडली. अरुंधती धुरु या कार्यकर्तीला अपमानास्पद

रितीने वागवले. दमणीबाईचा विनयभंग केला, सेलगदा येथील दोन तरुण मुलींवर दोघा पोलीस अधिकाऱ्यांनी बलात्कार केला. या सर्वांची कैफियत उच्च न्यायालयात केली आहे.

नर्मदा खोऱ्यातून आलेल्या शेतकरी, आदिवासींनी सतत प्रतिकार केला. अखेर २३ एप्रिलला पोलीस दल माघारी गेले. याचवेळी गावातील वृक्षकटाईसाठी जबरदस्तीने सर्व्हे करण्याचे प्रयत्नही झाले. या संपूर्ण कारवाईत नव्याने १८ कुटुंबे मणिबेली सोडून गेली, जी १९८६ ते १९९२ पर्यंत जाण्यातच जमा होती. अनेक कुटुंबे आधिच परवेटा येथे गेली होती. मणिबेली कारवाईचा उद्देशच लोकांमध्ये दहशत बसवून विस्थापन करविणे हा होता.

१९९२ च्या पावसाळ्यात मणिबेली बरोबरच गुजरातच्या पहिल्या प्रकल्पग्रस्त गावातील (वडगाम) भुलाभाई तडवींच्या पहिल्या झोपडीतही सत्याग्रह करण्यात आला. १८ ऑगस्टच्या रात्री प्रचंड पूर आला. धरणाच्या भिंतीमुळे साठलेला फुगारा 'समर्पित दल' जेथे होते तिथून अडीच फूटावर आला होता. सत्याग्रही अविचल होते.

१९९२ - ९३ दरम्यान लोकांमध्ये बुडिताची दहशत निर्माण करण्यासाठी धरणाचे बांधकाम कार्यपत्रिकेपेक्षा जादा वेगाने सुरू केले. जून ९३ पर्यंत नदीपात्रातील धरणाचे बांधकाम ६१ मीटर्सपर्यंत आणले. त्यामुळे मणिबेलीसहित महाराष्ट्र व गुजरातची किमान दहा - पंधरा गावांची जमीन व घरे बुडिताखाली येणार अशी शक्यता होती.

## घर, खेत नी गाव भी डूब्यो।...

- १९९३ च्या ११ जुलैच्या सायंकाळी वडगामच्या भुलभाई तडवींचे घर बुडाले. नर्मदा खोऱ्यातील पहिले घर धरणाच्या पाण्यात गेले. त्यानंतर धरणाच्या भिंतीमुळे पुराचे आक्राळविक्राळ पाणी चढतच राहिले, गावांमध्ये घुसतच राहिले. १२ जुलैला मणिबेलीतील शूलपाणीश्वर मंदिर बुडावयास सुरुवात झाली. १६ जुलैला रात्री मणिबेलीतील १५ घरात पाणी शिरले. पाण्याचा संतप्त प्रवाह वाढत असूनही अर्जुन कांती, विठ्ठलभाई, नारायणभाई, केसूभाई यांच्या घरात गुडघ्यापर्यंत, कमरेपर्यंत पाणी वाढूनही कुणीही हटले नाही. नारायण भाईंच्या घरात वीस दिवसाचे मूल होते. घरातील गुरे-कोंबड्या वाचविण्याचीच केवळ असोशी होती. कुणीही घरातले सामानही हलविले नाही. नारायणभाईंच्या घरात स्वत:चे गावातल्या इतरांचे व समितीचे धान्य होते, त्यांच्या दुकानातील

माल सामान होते, इतर घरातही सामान होते.... सर्व वाहून गेले. घराघरातून घोषणा होत होत्या- 'सरदार सरोवर क्या करेगा- सबका सत्यानाश करेगा' फुंफाट वाहणाऱ्या पाण्याच्या आवाजाला भेदून या घोषणा समोरच्या काठावर ऐकू जात होत्या.

- या दिवशी बुडिताचे पाणी ७४ मीटरवर येणार याचा अंदाजही सरकारी तज्ज्ञ, पोलीस अधिकारी यांना नव्हता. मणिबेली व इतरत्र कोस्ट गार्डची मदत, हवाई सर्वेक्षण इत्यादींचा नखरा दाखवूनही अखेर बुडिताने त्यांनाही चकविले. मणिबेलीतील लोकांना नंतर पोलिसांनी नेऊन जबरदस्तीने घराबाहेर काढले. त्यांना उंचावरील आसऱ्यावर नेले. मात्र लोकांनी सरकारी टिनशेडमध्ये जाण्याचे व सरकारी अन्न घेण्याचे नाकारले. ते उपाशी राहिले. वडगाम (गुजरात) मधील आदिवासींनीही हेच केले.
- बुडितामुळे गुजरातेतील १४ व महाराष्ट्रातील १२ गावातील शेकडो घरे पाण्याखाली गेली. शेकडो हेक्टरांवरील पिके नष्ट झाली. मुखडी, डनेल सारख्या गावात आदिवासींनी घरे, सामान ही हलविले नाही.
- वडगाममधील ३३ कुटुंबांनी १४ जुलैस केवडिया कॉलनीत, कालवा व कॉलनीमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींसहित धरणे धरले. त्यांच्यावर लाठीहल्ला होऊन त्यांना अटक झाली. १७ जुलैस अहमदाबादेत बंदीहुकूम मोडून गुजरातच्या संघटना व वडगावच्या विस्थापितांनी निदर्शने केली. तेथेही त्यांना अटक झाली. अन्यायाविरुद्ध निषेधावरही बंदी आली. दरम्यान गुजरात उच्च न्यायालयाने वडगामच्या बुडितग्रस्तांना तत्काळ भरपाई देण्याचा आदेश १८ जुलैला दिला.

१९ जुलै रोजी मणिबेलीतील बैठकीत लोकांनी आपली घरे व गाव न सोडण्याचा व अखेरपर्यंत लढण्याचा निर्णय घेतला. २२ ते २८ जुलै पर्यंत बाबा आमटे यांच्या नेतृत्त्वाखाली दिल्लीत धरणे ही दिले. जित्या-जागत्या गावांमध्ये पाणी घुसवून लोकांना हटविण्याच्या शासकीय दहशतवादाचा मुकाबला करण्याची निकड स्पष्ट केली.

## मणिबेली सत्याग्रह दडपशाही व जलसमर्पण

१० जून १९९३ पासून बुडिताला आव्हान देणाऱ्या मणिबेली सत्याग्रहाच्या फार आधीच २९ मे रोजी महाराष्ट्राचे ८०० पोलीस मणिबेलीवर चालून आले. मणिबेलीतील सर्व रस्ते बंद करण्यात आले. गावात ठिकठिकाणी पोलिस नाकी उभारली. नदी वाटाही रोखण्यात आल्या. पहिल्याच दिवशी

सरपंच नारायणभाई व केसूभाई (बुडितात येणारे मणिबेलीचे पहिले घर) यांना जबरदस्तीने गाडीत बसवून जमीन पाहावयास बोलावण्यात आले. नंतर त्यांनी सुटका करून घेतली. २९, ३०, ३१ मे व नंतरही गावात अटकसत्र सुरू राहिले. ३० मे रोजी केसुभाईंचे घर पाडण्यासाठी १०० - १५० पोलिस गेले, त्यावेळी त्यांची मुलगी कुंता हिने केवळ जिभेचा पट्टा सोडून सर्वांना लाजवून परत जायला लावले. मात्र ३ जून रोजी कुंतीसह घरातील सत्याग्रहींवर लाठीहल्ला करून नर्मदा खोऱ्यातील पहिले घर सरकारने तोडले. २ जूनला प्रसिद्ध शूलपाणीश्वर मंदिरात थातुरमातूर विधी करून तोतया शिवलिंगच खरे असल्याचे घोषित करून ते ट्रकमधून गोरा येथील नव्या किरटया मंदिरात आणले.

१ जून पासून नर्मदाखोऱ्यातील दीडशेजणांनी डहाणूपासून मुंबईकडे कूच सुरू केली. आदिवासी संघटनांच्या गावातून कष्टकरी संघटना, भूमिसेना, श्रमजीवी संघटना, सोशॅलिस्ट फ्रंट, युवा सभा घेत ३ जून रोजी मुंबईला मंत्रालयानजिक धरणे धरले. ३ जूनपासूनच मेधा पाटकर व देवरामभाई यांनी बेमुदत उपोषण सुरू केले. या दरम्यान पोलिसांनी दोनवेळा उपोषणकर्ते व कार्यकर्त्यांना अटक केली. उपोषणाच्या काळात जनतेमध्ये, राजकीय, सामाजिक संघटनांनी नर्मदा व पर्यायी विकासाच्या मुद्याला धरून आंदोलनाला पाठिंबा दिला. ११ जूनला झालेल्या विशाल सभेला डावे, समाजवादी पक्ष, अनेक कामगार संघटना, राजकीय, सामाजिक संस्थांनी समर्थन दिले. १२ जूनला केंद्रीय जलसंसाधन मंत्र्यांनी पंतप्रधानांच्या वतीने सरदार सरोवरासंबंधी पुनर्विचाराचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर पुन्हा पुनर्विचाराच्या चर्चेचे ठोस आश्वासन मिळाल्यावर १७ व्या दिवशी उपोषण मागे घेतले. त्यानुसार 'जलसमर्पण' सत्याग्रह ही स्थगित ठेवला.

२९-३० जूनला दिल्लीत केंद्र शासन, म. प्र. व महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी, नर्मदा बचाओ आंदोलनाचे प्रतिनिधी व तीन निष्पक्ष मान्यवर यांच्यात चर्चा होऊन धरणासंबंधीच्या सर्व बाबींवर पुनर्विचारासाठी मान्यवरांचा एक समूह बोलण्यावर एकमत झाले. मात्र पुनर्विचारांची ठोस प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच जर नर्मदा खोऱ्यातील गावे बुडितात आली तर 'मणिबेली सत्याग्रहातील निश्चयाप्रमाणे बुडिताला आवाहन देण्यासाठी नर्मदाखोऱ्यातील लोकांबरोबर रहावे लागेल असे आंदोलनाने त्याचवेळी स्पष्ट केले. गुजरात मधील शासनकर्ते व काही नोकरशहांच्या दबावामुळे पुनर्विचार प्रक्रिया सुरू करण्यात केंद्र सरकार का-कू करत आहे हे दिसत होते. एव्हांपर्यंत बुडित देखील येऊन गेले म्हणून १७ जुलैला 'जलसमर्पण' कार्यक्रम घोषित केला. या दरम्यान 'केंद्र शासनाने एकतर्फी घोषणा करून चर्चेसाठी समूह नियुक्त केल्याचे घोषित केले (३ ऑगस्ट). शासनाची ही कृती कोणत्याही निकषावर पुनर्विचार प्रक्रिया म्हणता येत नव्हती. हा जर

प्रस्ताव स्वीकारला असता तर नर्मदा खोऱ्यातील आंदोलनकारी, गावकरी, देशभरातील समर्थक व कार्यकर्ते यांची फसवणूक ठरली असती. म्हणून 'जलसमर्पण कार्यक्रम' कायम ठेवला. दरम्यान ५ ऑगस्ट रोजी या 'समूहा'ची बैठक झाली व तीत या सदस्यांनी सरदार सरोवरासंबंधी सर्व संबंधित बाबींवर विचार करून राष्ट्रहिताच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे आश्वासन दिले व 'जलसमर्पणा'ची कृती टाळण्याचे आवाहन केले.

- दरम्यान 'जलसमर्पणाच्या' कार्यक्रमाच्या दृष्टीने मणिबेलीकडे जाणाऱ्या किमान ८०० जणांना ४ व ५ ऑगस्टला अटक झाली. मणिबेलीत पोलिसी दहशत बसविली. लहान मुलींसह २५ जणांना अटक केली

## पुनर्विचार प्रक्रिया

५ ऑगस्ट रोजी केंद्र सरकारने सरदार सरोवराच्या सर्व अंगाबाबत पाच सदस्यांचा समूह घोषित केला. या समूहाने तीन महिन्यात आपला अहवाल द्यावयाचा असून अहवाल सादर होण्याच्या एक महिन्यात तो जाहीर करावयाचा आहे. सादर झाल्यानंतर अडीच महिन्यात केंद्र सरकार आपली प्रतिक्रिया देईल.

श्री. जयंत पाटील सदस्य नियोजन मंडळ, निमंत्रक, डॉ. एल. सी. जैन, (अर्थशास्त्रज्ञ), रामस्वामी ऐयर, डॉ. कुलैंदस्वामी (पाटबंधारे तज्ज्ञ) डॉ. गोवारीकर (शास्त्रज्ञ) हे समूहाचे सदस्य होत.

- गेली आठ वर्षे धरण विरोधी आंदोलनाची एक प्रमुख मागणी मान्य झाली. पुनर्विचाराची प्रक्रिया सुरू झाली. सप्टेंबर १९९३ अखेर सहावेळा या समूहासमोर आंदोलनाने आपली भूमिका ठेवली. सर्वांगिण पुनर्विचाराची मागणी करताना प्रकल्पाची आखणी, नियोजन, निर्णयप्रक्रिया, लाभांची विश्वसनीयता, सामाजिक सांस्कृतिक व पर्यावरणीय किंमत, पर्याय, संपूर्ण नर्मदा खोरे योजना, गुजरातची पाणी समस्या व खरे उपाय इ. मुद्दे समुहासमोर ठेवले.
- भारताच्या राजकीय संस्कृतीमध्ये अनेक राजकीय दबावाखाली अशा योग्य व तार्किक प्रक्रिया दबून जातात, विकृत होतात व शेवटी निरर्थकही ठरतात याची 'आंदोलना'ला जाण आहे. गुजरातचे राज्यकर्ते व अन्य हितसंबंधितांनी आतापासूनच राजकीय दबाव आणण्यास सुरुवात केलेली आहे. गुजरातच्या राज्यकर्त्यांनी केंद्र शासनाला धमक्याही देणे सुरू केले.
- दुसरीकडे धरणासमोर आर्थिक संकट उभे आहे. केंद्र शासनाने मदत देण्यास

नकार दिला. अनिवासी भारतीयांच्या गुंतवणुकीचे बाँडस् किंवा करमुक्त बाँण्डस् जारी करण्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली नाही. हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यासही मंजुरी मिळाली नाही. राजस्थान, म.प्र. या राज्यांनी आपला वाटा दिला नाही. ते केंद्राकडे पैसा मागत आहेत.

- गुजरातेत मात्र प्रांतीय वाद पुन्हा एकदा उभा केला जात आहे. लोकांपासून सत्य लपविले जात आहे. तरीही गुजरातमधील, विशेषत: कच्छ - सौराष्ट्र व उत्तर गुजरातेतील अनेक संघटना पुनर्विचाराच्या प्रक्रियेत सहभागी होत आहेत.

## कायम बुडित आणण्याचे मनसुबे

लोक हटत नाहीत व पुनर्विचार जारी आहे तरीही येत्या पावसाळ्यात (१९९४) कायमी बुडिताच्या पर्मनन्ट सबमर्जन्सच्या दृष्टीने धरणाच्या भिंतीखालील स्लूईसेस बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. स्लूईसेस बंद करण्यासंदर्भात गुजरात सरकार दडपण आणत आहेत. महाराष्ट्रातील गावातील लोक हटले नाहीत तरीही कायमचे बुडित आणण्यास महाराष्ट्र शासनाने विरोध करावयास हवा. वस्तुत: जोपर्यंत महाराष्ट्रातील गावात लोक आहेत, हटत नाहीत, तोचपर्यंत गावे बुडतील असे कोणतेही धरणाचे बांधकाम पुढे नेण्यास महाराष्ट्राने विरोध केला पाहिजे. तेवढे राजकीय धाडस दाखविणे तर दूरच, पण साधे कायमचे बुडित नको अशी ठाम भूमिका सुद्धा महाराष्ट्राला घेता येत नाही असे दिसते. देशभरातल्या साथींनी

***पंतप्रधान (७, रेसकोर्स रोड, नवी दिल्ली - १),***

***केंद्रीय जलसंसाधन मंत्री, श्रमशक्ती भवन, रफी रोड, नवी दिल्ली - १ व मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई - ३२***

येथे पत्र व तारा, निवेदने पाठवून लोक हटले नसताना बुडित आणू नये व स्लुईस गेटस् बंद करू नयेत अशी जोरदार मागणी करावी.

## या संघर्षात आपण केवळ बघ्याची भूमिका घेणार?

### जगण्याचा हक्काच्या या लढ्याला साथ द्या.

सरदार सरोवराच्या पुनर्विचाराच्या प्रक्रियेला योग्य रितीने चालण्यासाठी आपण नोव्हेंबर १९९३ पर्यन्त केंद्रशासन मध्यप्रदेश व महाराष्ट्र शासनांना पत्र / तारा / अन्य मार्गाने संपर्क करावा. केंद्र शासनाने कोणत्याही दबावाखाली न झुकता धरणाच्या व्यापक पुनर्विचाराची प्रक्रिया पूर्ण करावी व त्यानुसार कार्यवाही करावी. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना लिहून / भेटून आपल्या आदिवासींचे रक्षण करण्याच्या दृष्टीने धरणाच्या पुनर्विचाराची व धरणाचे पुढील बांधकाम थांबविण्याचे धाडस दाखवण्याचा आग्रह करावा. मध्यप्रदेशच्या राज्यपालांना, मध्यप्रदेशने पुनर्विचाराच्या संधीचा लाभ घेऊन म. प्र. व देशाच्या साधन संपत्ती व लोकांच्या बचाव करावा असा आग्रह करावा.

आंदोलनाचे मुद्दे, त्यामागील विश्लेषण, माहिती समजावून घेऊन त्याचा प्रसार करा. आपल्या भागातील अशाच तथाकथित विकासाबद्दलही डोळसपणे तपास करावा. दोन्ही मुद्दे एकत्र उठवावेत.

आपल्या भागातील संस्था, संघटना, व्यक्तिंशी संपर्क करून समर्थन समूह निर्माण करून त्या भागातील मुद्दे व नर्मदेच्या संघर्षाचे मुद्दे जोडून सहयोग सहकार्य.

नर्मदा खोऱ्यातील गावांमध्ये संघटन कार्यासाठी अनुभवी, संघटनांची आवड / कौशल्य असणारे साथी आपला काही काळ (१ वर्ष, ६ महिने) देऊ शकतील?

**आर्थिक मदत :** आपल्या मदतीवरच हे आंदोलन चालले आहे, पुढे चालेल. आपल्या भागातून छोटी - छोटी मदत एकत्र करणे किंवा दरमहा रु. १००/- देणारे सहयोगी / स्वतःच्या उत्पन्नाचे २% देणारे साथी 'सहयोगाचा' भाग बनू शकतील.

***स्टेशनरी, अन्य उपयुक्त वस्तुरुपात मदत करा.***
***आपली मदत (चेक, ड्राफ्ट, रक्कम)***

- *नर्मदा धरणग्रस्त समिती या नावाने*

C/o **श्री. दशरथ पाटील,**
२४, अशोकनगर, धुळे - ४२४००१
फोन : २२९१९

- *नर्मदा बचाओ आंदोलन या नावाने*

  C/o लता प्र. म.
  रुम नं. ११७, इमारत ८
  डॉ. बालिगानगर, जस्मिन मिल रोड,
  माहीम (पू) मुंबई - ४०००१७
  फोन : ४०७०६२३, ४१४३४९८

- *नर्मदा घाटी नवनिर्माण समिती या नावाने*

  ६२, गांधी मार्ग, बडवानी,
  म. प्र. - ४५१५५१

*या ठिकाणी पाठवावी. हे पत्ते संपर्कासाठीही उपयोगी आहेत.*

संपर्क :

*नर्मदा बचाओ आंदोलन*

- **जे. जॉन**
  दिल्ली फोरम : F-१० / ११ मालवीय नगर
  दिल्ली - ११००१६
  फोन : ६८८३५८२

- **आशिष कोठारी**
  'कल्पवृक्ष' सी. १७ / ए मुनीरका
  दिल्ली - ११००६७
  फोन : ६८३८८९४

- **साधना दधिच / सहकारी**
  नर्मदा बचाओ आंदोलन
  C/o अमृता क्लिनीक, आठवले बिल्डिंग
  संभाजी पूल, कर्वे पथ, पुणे - ४११००४
  फोन : ३४१२३०, ३३०५७७

- **योगेश दिवान / साथी**
  नर्मदा समर्थन समूह
  कसेरा मोहल्ला, होशंगाबाद (म. प्र.)

## नर्मदा

नर्मदा की घाटी में अब लडत जारी है।
चलो उठो, चलो उठो रोकना विनाश है।।
विकास के ही नामपर बाँध का ये खेल है।
सोच लो, जान लो, लाभ - हानि कितनी है।।
सिंचाई की भी भूल है, दल दल तो होनी है।
गन्ने की खेत में, मजदूर पिसाया है।।
बिजली का जाल हैं, शहरोंकी चाल है।
तापी मे न बन सकी, वही हाल होना है।।
न जाँच है, न परख है, झूठे हिसाब है।
करोंडोंकी लागत, गुजराथ की ही लूट है।।
राजनीति साफ है, कुर्सी पाँच साल है।
बाँध फिर होन हो, अपना अपना रोना है।।
मजदूर का घर तोडकर, किसान का हल छीनकर।
देखो ये तो छोडेंगे, लाखोंको उजाडकर।।
न जमीन है, न दाम है, पुनर्वास का नाम है।
भुलाकर भगानेका सारा इन्तजाम है।।
मंत्री का ऐलान है, पार्टीका आव्हान है।
भाई अपना सोच लो, ठेकेदार का राज है।।
लाभोंका वादा है, मानव का सौदा है।
पचास साल के लिये, पिढियोंका रोना है।।

*प्रकाशक : संजय संगवई, नर्मदा बचाव आंदोलन,*
*उदय निवास, दांडिया बाजार, बडोदा ३९०००१.*
*मुद्रक : मा. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३, सदाशिव पेठ, पुणे : ३०.*